# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

**दूरध्वनी : (०२२)६९९६५५५५, फॅक्स :(०२२)६९९६५५९९** **ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in**

जा. क्र./मरासुम/प्रशासन/2120/२०२४ दि. ५/०७/२०२४.

## -: जाहिरात :-

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या मुख्यालयातील वायरींग, नेटवर्कींग तसेच टेलिफोन कनेक्टीविटी संदर्भातील सर्व कामकाज करणेकरिता पुरवठादाची निवड करण्यासाठी प्रस्तूत जाहिरात देण्यात येत आहे.

या सोबत सविस्तर जाहिरात प्रसिध्द् करण्यात येत आहे. इच्छूक पुरवठादार यांनी सदरची जाहिरात सविस्तर वाचून त्यात नमुद सर्व कामकांजाकरिता आपले दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात कार्यालयाच्या वरील नमुद पत्यावर दि. ०८/०७/२०२४ ते १८/०७/२०२४ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी ९.४५ ते सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत सादर करावी.

सविस्तर जाहिरातीकरिता महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in आणि https://mahasecurity.gov.in/ वेबसाईटला भेट द्यावी.

Sd/-

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

## १. प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे शासनाचे वैधानिक महामंडळ आहे. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामार्फत केंद्र व राज्य शासनाची कार्यालये, त्यांचे उपक्रम, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, शासकीय किंवा निमशासकीय संस्था याद्वारे याबाबतीत स्वतंत्र तरतुदी करून निर्माण केलेले मोठे पूल, विशेष आर्थिक क्षेत्रे, खाजगी बंदरे व लहान धक्के, धरणे व द्रुतगती मार्ग इत्यादी पायाभुत सुविधांना आणि मॉल्स, मल्टिप्लेक्स, क्लब, हॉटेल इत्यादी यांसह वाणिज्यिक आस्थापनांना, सक्षम प्राधिकारी यांनी केलेल्या विशेष विनंतीवरून सुसज्जय मनुष्यबळामार्फत व्यावसायिक व्यासवियक सेवा पुरवून त्यांचे अधिक चांगले संरक्षण करण्यासाठी व त्यांना सुरक्षा पुरविण्यासाठी अशा आस्थापनांना व संस्थांना तंत्रविषयक सल्ला देण्याकरिता मनुष्यबळामार्फत सुरक्षा व संरक्षण पुरविणे हे महामंडळाचे प्रमुख उद्दीष्टे आहे.

मुख्यालयातील सर्व कर्मचा-यांचे संगणक इंटरनेटशी वायरींगच्या माध्यमातून जोडलेली आहेत. इंटरनेटची वायरींग आणि टेलिफोनची वायरींग या दोन्ही सर्वर रुमपासून संगणकापर्यत योग्य रितीने पोहोचवणे व त्यासाठी Cramping, Flagging, टेलिफोनचे Digital connection, Normal Connection, सर्वर रुमचे wire Jumbling, Racking अशी विविध स्वरुपाची कामे करावयाची आहेत. त्याची वैशिष्ट्ये:-

१. Internet Connection Speed - Approx. 100 mbps, in future 1 Giga
२. Cabling Type - Cat 6
३. Firewall - Cisco Firewall / juniper
४. Topology - Direct
५. Network Security - IDP/IPS, Anti - Virus
६. Power and cooling - PDU
७. Scalability - Up to 100
८. Telophone Connection (Digital / Normal)

**इच्छूक दरपत्रकधारक यांनी मुख्यालयात प्रत्यक्ष पहाणी करावी आणि त्यानंतर दरपत्रके सादर करावीत. कार्यालयात प्रत्यक्ष पाहणीसाठी सकाळी १०.३० ते १७.०० या वेळेत येता येईल.**

## २) पुरवठादार यांनी सादर करावयाची कागदपत्र :-

१. पॅनकार्ड/आधार कार्ड/पासपोर्ट/मतदार व ओळखपत्र इ. पैकी कोणतेही एक ओळखपत्र.
२. पुरवठादारांच्या नावे GST अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

**३) दरपत्रक सादर करण्यासाठी कार्यालयाचा पत्ता :-**

व्यवस्थापकीय संचालक तथा पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
सेंटर - १, ३२वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी क्र.: (०२२)६९९६५५५५, ई-मेल आय.डी.- **info.mahasecurity@maharashtra.gov.in**

**४) दरपत्रक सादर करण्याचा कालावधी :-**

दिनांक :- ०८/०७/२०२४ ते दि.१८/०७/२०२४ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत.

**५) दरपत्रक उघडण्याची दिनांक व ठिकाण :-**

दिनांक :- :- १९/०७/२०२४ वेळ १२.०० वाजता.
ठिकाण :- महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर,
कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी क्र.:(०२२)६९९६५५५५, फॅक्स नंबर:- (०२२)६९९६५५९९
ई-मेल आय.डी.- **info.mahasecurity@maharashtra.gov.in**

दरपत्रक उघडताना दरपत्रकधारक यांनी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. उपस्थित न राहिल्यास दरपत्रक रद्द समजण्यात येईल.

**६) सूचना :-**

दरपत्रक सादर करणेपुर्वी खालील सूचना काळजीपुर्वक वाचाव्यात.

१. दरपत्रकामध्ये कामकाजाबाबतचा सर्व तपशील अचुक नमूद करणे आवश्यक आहे.
२. दरपत्रकामध्ये वस्तूची मूळ किंमत त्यांची Installation rate व इतर कर - जी.एस.टी., इत्यार्दीबाबींकरीता येणारा खर्च स्पष्ट व स्वतंत्रपणे नमूद करण्यात यावी.
३. सदरच्या कामकाजाकरिता किती कालावधी लागेल याचा उल्लेख दरपत्रकामध्ये करण्यात यावा.
४. दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात पोस्टाने कुरीअरद्वारे पाठविण्यात येत असल्यास अंतिम दिनांकापुर्वी महामंडळाच्या कार्यालयास पोहोच होतील याची दक्षता घ्यावी. मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.
५. एका वेळेस एकच दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे. एका पुरवठादाने अनेक दरपत्रक सादर केल्यास त्याची सर्वच दरपत्रके बाद करण्यात येतील.
६. दरपत्रकधारक यांची G.S.T. अंतर्गत नोंदणी अनिवार्य आहे.

७) <u>निवड प्रक्रिया :-</u>

१. निवड केलेल्या पुरवठादारास निवड केल्याबाबतचे पत्र ई-मेल किंवा पत्राद्वारे कळविले जाईल.
२. निवड प्रक्रिये दरम्यान आवश्यकता भासल्यास (Negotiation) कार्यालयास हजर रहावे लागेल.
३. कामकाजपूर्ण झाल्यानंतर महामंडळास पुरवठादारांनी टॅक्स इनव्हाईस सादर करावे व त्यानंतर त्यांना देयक अदा करण्यात येईल. टॅक्स इन्व्हाईसमध्ये पुरवठादाराचा जी.एस.टी. क्रमांक, पॅन क्रमांक आणि बँकेचा तपशील नमूद असणे आवश्यक आहे.

**सदर जाहिरात कोणत्याही वेळी/कोणत्याही कारणास्तव/कोणत्याही टप्प्यावर/पुर्णत: किंवा अंशत: रद्द करण्याचा/फेरबदल करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.**

Sd/-

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.